# अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी आणि
# गोगटे - जोगळेकर वरिष्ठ व पदव्युत्तर महाविद्यालय, (स्वायत्त) रत्नागिरी
## महत्त्वाची सूचना

---

दिनांक :- ०९/०८/२०२४

कनिष्ठ, वरिष्ठ पदवी व पदव्युत्तर विभागातील शैक्षणिक वर्ष (२०२४ - २०२५) मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात इयत्ता ११ वी कला, विज्ञान, वाणिज्य, एम.सी.व्ही.सी. व प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम. ए., एम. एस्सी., एम कॉम भाग १ मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती खाली सवलत घेऊन प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी माननीय समाजकल्याण अधिकारी, रत्नागिरी यांच्या सूचनेनुसार आपल्या सवलतीचा अर्ज **https:/mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर नव्याने **(Fresh)** बिनचूक भरावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी (शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४) मध्ये सवलत घेऊन पुढील वर्गामध्ये प्रवेश घेतला आहे. उदा. इ. १२ वी कला, विज्ञान, वाणिज्य, एम.सी.व्ही.सी. तसेच द्वितीय व तृतीय वर्ष, कला विज्ञान, वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम. ए., एम. एस्सी., एम कॉम भाग - २ मधील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज नूतनीकरण **(Renewal)** वरील वेबसाईटवर पूर्ण भरावे. **तसेच मागील वर्षी ज्या विद्यार्थ्यांनी सवलतीचा अर्ज भरला नसेल अशा विद्यार्थ्यांनी वरील वेबसाईटवर नव्याने (Fresh) अर्ज बिनचूक भरायचा आहे.** सवलीचा अर्ज भरून झाल्यावर त्याची छापील एक प्रत संबंधित काम पाहणारे कर्मचाऱ्यांकडे कार्यालयात दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० या वेळेत जमा करावयाचे आहेत. या तारखेपर्यंत शिष्यवृत्तीचा अर्ज ची छापील प्रत संबंध कर्मचाऱ्यांकडे जमा न केल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थांची राहील व शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ ची पूर्ण फी भरावी लागेल याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. शिष्यवृत्तीसाठी लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे आहे छापील अर्जासोबत खालील झेरॉक्स प्रति जोडणे आवश्यक आहे.

०१) एस. एस. सी. / एच. एस. सी. गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत – १

०२) शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स सत्यप्रत – १

०३) मागील वर्षीच्या गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत – १

०४) जातीचे दाखल्याची (तहसीलदार कार्यालयातील) झेरॉक्स सत्यप्रत – १

०५) स्वतःच्या आधार कार्डची झेरॉक्स सत्यप्रत – १

०६) रेशन कार्डची झेरॉक्स सत्यप्रत – १

०७) डोमीसाईल दाखला (अधिवस दाखला) झेरॉक्स सत्यप्रत – १

०८) बँक पासबुक झेरॉक्स सत्यप्रत – १

०९) आधार कार्ड NPCI – Mapping & Linking ( विद्यार्थ्यांचे ज्या बँकेत खाते आहेत त्यांच्या शिक्का असणारी झेरॉक्स)

१०) प्रवेश फी पावती (संस्था विकास निधीची पावती अपलोड करू नये.)

११) अपत्य प्रतिज्ञापत्र (VJNT / OBC / SBC )

१२) उत्पन्न दाखला

१३) शिक्षणामध्ये खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट

**अ)** इयत्ता १२वी कला, विज्ञान, वाणिज्य, एम.सी.व्ही.सी. तसेच द्वितीय व तृतीय वर्ष, कला, विज्ञान, वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम. ए., एम. एस्सी., एम कॉम भाग - २ वर्षांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षामध्ये सवलत घेतलेला उत्पन्नाचा दाखल्याची प्रत जोडणे आवश्यक आहे. झेरॉक्स सत्यप्रत- १ (एक)

**ब )** इयत्ता ११वी कला, विज्ञान, वाणिज्य, एम.सी.व्ही.सी. तसेच द्वितीय व तृतीय वर्ष, कला, विज्ञान, वाणिज्य तसेच पदव्युत्तर विभागातील एम. ए., एम. एस्सी., एम कॉम भाग - १ या विद्यार्थ्यांनी (दिनांक ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या वर्षाचा तहसीलदार कार्यालयातील उत्पादनाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत- १

OBC / VJNT /SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा रु. १,५०,०००/- व फ्रीशिपसाठी उत्पन्न मर्यादा रु. 8,००,०००/- आहे.

SC / ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- व फ्रीशिपसाठी उत्पन्न मर्यादा नाही.

वर नमूद सूचनेप्रमाणे आपल्या उत्पन्न गटाप्रमाणे स्कॉलरशिप / फ्रीशिपचा योग्य पर्याय ऑनलाईन अर्ज भरताना बिनचूक निवडणे आवश्यक आहे व सदर जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.

**क )** फक्त (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी इयत्ता ११वी / इयत्ता १२वी तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष तसेच पदव्युत्तर विभाग १ व २ मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी नवीन उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१४) सद्यस्थिती चालू असणारा मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे कारण त्या नंबर वरती आपल्या सवलतीच्या अर्जाचा **(OTP)** नंबर येणार आहे व नंतरच आपला अर्ज भरला जाणार आहे. विद्यार्थ्यांचा स्वतःचा ईमेल आयडी असणे आवश्यक आहे. मोबाईल प्रमाणे ईमेल आयडी वर सुद्धा **(OTP)** पाठविला जातो. आधार कार्डशी संलग्न झालेला सदर मोबाईल नंबर व ईमेल आयडी बदलू नये.

१५) वडील हयात असल्यास वडीलांच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. वडील हयात नसल्यास आईच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोन्ही हयात नसतील त्यांनी संगोपन करणाऱ्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत -१ (उत्पन्नाचे सदर दाखले शासनाच्या सेतू कार्यालय मार्फत दिलेले असणे आवश्यक आहे.)

१६) वडील हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला किंवा आई घटस्फोट असल्यास त्याबद्दल रु. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे याची झेरॉक्स सत्यप्रत – १

१७) शिक्षण घेत असताना खंड (गॅप) पडला असल्यास रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे याची झेरॉक्स सत्यप्रत – १ ( तहसीलदार कार्यालयातील असावी. )

१८) स्वतःचे बचत खाते (BANK A/C ) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत काढून आपले आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न करणे आवश्यक आहे त्याची झेरॉक्स सत्यप्रत – १ जोडणे आवश्यक आहे. बँकेतील खाते NPIC – MAPPING यांच्याशी सुद्धा संलग्न करणे आवश्यक आहे. यासाठी छापील अर्ज नोटीस बोर्डवर लावलेला आहे. तसेच **https:/mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर अर्ज भरून बँकेमध्ये दाखल करावा.

१९) महाविद्यालयात प्रवेश घेताना भरलेल्या रकमेच्या मूळ पावतीची -१ झेरॉक्स प्रत जोडावी. (महाविद्यालयांनी प्रवेशाच्या वेळी प्रतिपूर्ती होणारी कोणतीही फी विद्यार्थ्यांकडून घेतलेली नाही त्यामुळे फी किती भरली (FEE PAID) या ऑप्शनला शून्य (0) करावे.

**ऑनलाईन शिष्यवृत्ती चा अर्ज भरताना खालील प्रमाणे सूचनांचे पालन करून अर्ज भरावा.**

०१) शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी कागदपत्रे स्कॅन करून ती वेबसाईट वरती अपलोड करावयाची आहे.

०२) SC/ST/VJNT/SBC/OBC या प्रवर्गाचे जे विद्यार्थी शासकीय मागासवर्गीय वसतिगृहात राहत असतील त्यांनीच फक्त HOSTELLER हा ऑप्शन निवडावयाचा आहे. तसेच खाजगी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी (DAY SCHOLAR) हा ऑप्शन निवडावयाचा आहे.

०३) VJNT/SBC/OBC या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील फक्त २ मुलगे शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र आहेत. नियमानुसार ३ रा मुलगा शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ शकणार नाही. सबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी. मुलींसाठी तसेच SC/ST प्रवर्गासाठी अपत्य मर्यादा नाही.

०४) कुटुंबातील पुरुष अपत्यांची संख्या दर्शविणारे प्रतिज्ञापत्र पालकांची तसेच विद्यार्थ्यांची सही करून त्याची स्कॅन केलेली मूळ प्रत (Orignal) अपलोड करावयाची आहे. सदर प्रतिज्ञापत्राचा नमुना महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला आहे, तसेच **https:/mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

०५) शिष्यवृत्तीचे अर्ज पूर्ण भरून कार्यालया मध्ये सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० या वेळेत खालील कर्मचाऱ्यांकडे जमा करावेत.

तसेच याबाबत कोणती अडचणी असल्यास खालील कर्मचाऱ्यांकडे त्वरित संपर्क साधावा.

०१) वरिष्ठ महाविद्यालय - इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती व फ्री शिप शिष्यवृत्ती -
श्री भरणकर व्ही. व्ही. (९९२३०६३३७९)

०२) कनिष्ठ महाविद्यालय - इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती व फ्री शिप शिष्यवृत्ती -
श्री. पोळेकर सी. पी. - (८६६८६५७०७५)

०३) कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर विभाग – मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती व फ्री शिप शिष्यवृत्ती -
श्री. यादव आर. व्ही. - (९८६७८९६१९०)

०४) कनिष्ठ महाविद्यालय एम.सी.व्ही.सी.विभाग - सर्व शिष्यवृत्ती –
श्री. मुळ्ये आर. आर.

R.P.G.C. of Arts & Sci. & R.V.J.C. of Com. (Autonomous) RATNAGIRI

प्राचार्य
Principal
R.P.Gogate College of Arts & Science and
R.V.Jogalekar College of Commerce
(Autonomous),Ratnagiri